**महाराष्ट्र शासन**

**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर -440022**

**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा .क्र.वनार्टी /आस्था/ सुचना/ ६८२ /२०२६-२७ दिनांक :-०३/०८/२०२६

# सूचना

## वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर येथे वृत्तलेखक व माध्यम वार्तांकन सेवा उपलब्ध करून देण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत.

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी), नागपूर ही इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत संस्था असून, विमुक्त जाती व भटक्या जमाती या लक्षित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशिक्षण, संशोधन, कौशल्य विकास, उद्योजकता विकास तसेच सामाजिक विकासाशी संबंधित विविध योजना व उपक्रम राबविते. संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्रशिक्षण कार्यक्रम, लाभार्थी यशोगाथा, तज्ज्ञ व्यक्तींच्या मुलाखती, समाजातील विविध घटकांशी संवाद, जनजागृती कार्यक्रम तसेच इतर उपक्रमांचे वृत्त संकलन, वृत्तलेखन, प्रसिद्धीपत्रके तयार करणे, माहितीपर लेख, यशोगाथा व बातम्या तयार करून त्या विविध प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध करणे, तसेच संकेतस्थळ व समाजमाध्यमांसाठी माहिती तयार करण्याचे कामकाज करण्यासाठी अनुभवी व पात्र व्यक्तीकडून विहित नमुन्यात **बंद लिफाफ्यात दरपत्रके** मागविण्यात येत आहेत.

### १. शैक्षणिक पात्रता

1. मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी.
2. पत्रकारिता/जनसंपर्क/मास कम्युनिकेशन विषयातील पदवी किंवा पदविका असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
3. मराठी भाषेवर उत्कृष्ट प्रभुत्व तसेच इंग्रजी भाषेचे कार्यसाधक ज्ञान असणे आवश्यक.
4. संगणक हाताळणी व मराठी टंकलेखनाचे ज्ञान आवश्यक.

### २. अनुभव

1. वृत्तलेखन, संपादन, प्रसिद्धीपत्रके तयार करणे किंवा प्रसारमाध्यमांमध्ये कामाचा किमान १ ते २ वर्षांचा अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

### ३. कामाचे स्वरूप

1. संस्थेच्या विविध योजना, कार्यक्रम व उपक्रमांचे वृत्त संकलन व वृत्तलेखन करणे.
2. प्रसिद्धीपत्रके, माहितीपर लेख, यशोगाथा व बातम्या तयार करणे.
3. संस्थेच्या संकेतस्थळ व समाजमाध्यमांसाठी माहिती तयार करून उपलब्ध करून देणे.
4. छायाचित्रे, व्हिडिओ व इतर आवश्यक माहितीचे संकलन, संपादन व दस्तऐवजीकरण करणे.
5. संस्थेच्या कार्यक्रमांची प्रसारमाध्यमांमध्ये प्रभावी प्रसिद्धी होण्यासाठी आवश्यक समन्वय साधणे.

**४. दरपत्रक सादर करण्याबाबत**

इच्छुक, पात्र व अनुभवी व्यक्तींनी विहित नमुन्यातील दरपत्रक आवश्यक कागदपत्रांसह **बंद लिफाफ्यात** दिनांक ०७/०८/२०२६ **रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** खालील पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत जमा करावे.

**पत्ता :**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी),
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,
खोली क्र. ३०५ तिसरा मजला, दीक्षाभूमी रोड,
श्रद्धानंद पेठ, नागपूर – ४४००२२.

वनार्टी संस्थेस कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा तसेच ही सूचना अंशतः किंवा पूर्णतः रद्द अथवा बदल करण्याचा अधिकार राहील. याबाबत संस्थेचा निर्णय अंतिम व सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील. वृत्तलेखक व माध्यम वार्ताकन या साठी संबंधित क्षेत्रातील पात्र व अनुभवी व्यक्ती यांचेकडून दरपत्रके मागविण्याकरीता सुचना प्रसिद्ध करण्यात येत आहेत.

**स्वा**
**(प्रशांत वावगे)**
व्यवस्थापकीय संचालक (प्र).
वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था, (वनार्टी)